**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच** (ग्रा.गा.नि.मं)

**अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (AEML)**

देविदास लेन, ऑफ एस.व्ही.रोड, देविदास लेन टेलीफोन एक्सचेंज च्या शेजारी,
बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३.
संकेतस्थळ: www.adanielectricity.com / www.cgrf.adanielectricity.com
ईमेल: consumerforum.mumbaielectricity@adani.com
दूरध्वनी क्रमांक : ०२२-५०७४५००४

---

**ग्रा. गा. नि. मं. गाऱ्हाणे अर्ज प्रकरण क्र. CGRF06004/2022-23 दिनांक : 10/06/2022**

श्री. सुनील शिवकुमार पवार, शॉप नंबर १, श्रीकृपा ट्रॅव्हल्स, सी.टी.एस. क्रमांक २८८/४/५, मिलिंद नगर, त्रिपाठी हॉल असल्फा, घाटकोपर, मुंबई ४०००८४

खाते क्रमांक: 151057338, व्यावसायिक, पूर्व विभाग

श्री. सुनील शि. पवार ..................... **अर्जदार / तक्रारकर्ता**

**अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल)** ..................... **प्रतिवादी (सेवा संस्था)**

**कोरम:**
(अर्जदाराच्या/ तक्रारदाराच्या दिनांक 30/07/2022 रोजीच्या अर्जासंबंधी आदेश निश्चित करण्यासाठी)

१. श्री. डी. डब्ल्यू. देशपांडे (निवृत्त जिल्हा न्यायाधीश), अध्यक्ष. ग्रा.गा.नि.मं
२. श्रीमती शर्मिला रानडे, सदस्य (स्वतंत्र सदस्य- ग्राहक संरक्षण संघटना), ग्रा.गा.नि.मं
३. श्री. आशिष खेडकर, उपाध्यक्ष (अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.) – तांत्रिक सदस्य, ग्रा.गा.नि.मं

**अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) च्या वतीने**

कोणी नाही

**अर्जदार / तक्रारदाराच्या वतीने**

कोणी नाही

TRUE COPY
SECRETARY
FORUM FOR REDRESSAL
OF CONSUMER GRIEVANCES
Adani Electricity AEML

**02/08/2022 रोजीचा आदेश**

अर्जदार/तक्रारदार सुनील शिवकुमार पवार यांनी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचामध्ये थकबाकीच्या बिलावर आकारण्यात आलेल्या व्याजात सूट मिळण्याकरिता गाऱ्हाणे दाखल केले आहे.

अर्जदाराने/तक्रारदाराने, दिनांक 30/07/2022 रोजी मंचासमोर अर्ज केला की, प्रस्तुतचे प्रकरण अर्जदारामध्ये/तक्रारदारामध्ये आणि प्रतिवादी अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड मध्ये सामंजस्याने मिटले आहे. अर्जदाराचे/तक्रारदाराचे असेही म्हणणे आहे की, अर्जदार /तक्रारदार हा वीज बिलावर आजपर्यंत आकारण्यात आलेल्या व्याजापैकी ५०% व्याज आणि थकबाकी सह नियमित बिल भरण्यास तयार आहे. अर्जदार /तक्रारदार आपले गाऱ्हाणे (तक्रार) मागे घेत आहे.

अर्जदार/तक्रारदार व प्रतिवादी (अदानी कंपनी) यांच्यामध्ये या प्रकरणाबाबत समझौता झाल्यामुळे सदर तक्रार (गाऱ्हाणे) (तडजोडीमुळे) निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अर्जदाराची/ तक्रारदाराची तक्रार (गाऱ्हाणे ) ही अर्जदार/तक्रारदार व प्रतिवादी (अदानी कंपनी ) यांच्या मध्ये तडजोड झाल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

३) कार्यवाही समाप्त.

**दिनांक** : 2 ऑगस्ट' 2022
**स्थळ** : मुंबई

Sd/-
**डी. डब्ल्यू. देशपांडे (निवृत्त जिल्हा न्यायाधीश)**
अध्यक्ष - ग्रा.गा.नि.मं.

Sd/-
**शर्मिला एस. रानडे**
स्वतंत्र सदस्य- (ग्राहक संरक्षण संघटना) - ग्रा.गा.नि.मं.

Sd/-
**आशिष खेडकर**
तांत्रिक सदस्य – ग्रा.गा.नि.मं.

TRUE COPY
SECRETARY
FORUM FOR REDRESSAL
OF CONSUMER GRIEVANCES
Adani Electricity 'AEML